महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
**संचालनालय, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य**
तळ मजला, कस्तुरी इमारत, पेट्रोलियम हाऊस समोर, जमशेदजी टाटा मार्ग,चर्चगेट, मुंबई-४०००२०.
दुरध्वनीक्रमांक: ०२२-२२८८००१०६/०७ E-mail : admin-dat@mah.gov.in

संदर्भ : दिव्यांग कल्याण विभाग शासन निर्णय क्र.दिव्यांग-२०२५/प्र.क्र.१०/E Office No.१३३९०२०/कार्यासन-३, दि.०९/१०/२०२५

---

क्र.संलेको/प्रशा-राप/का-४/२०२५/ 1145 दि. 18 NOV 2025

**विषय: महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा संचालक , सहसंचालक, उपसंचालक व सहायक संचालक संवर्गातील दिव्यांग अधिकाऱ्यांनी दिव्यांगत्व प्रमाणपत्र (UDID कार्ड) सादर करण्याबाबत.**

# -: परिपत्रक :-

संदर्भीय शासन निर्णयान्वये शासन सेवेत कार्यरत असलेले तसेच भरती, पदोन्नती किंवा इतर शासकीय लाभ दिव्यांग आरक्षणांतर्गत घेत असलेले सर्व दिव्यांग अधिकारी व कर्मचारी यांनी वैध Unique Disability ID (UDID) कार्ड प्राप्त करून त्याची प्रत सादर करणे बंधनकारक आहे.

त्यानुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेत कार्यरत संचालक , सहसंचालक, उपसंचालक व सहायक संचालक संवर्गातील सर्व दिव्यांग अधिकारी यांनी दिव्यांगत्व प्रमाणपत्र / UDID ओळखपत्राची प्रत या परिपत्रकाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत संचालनालयास सादर करावी. तसेच आपल्या दिव्यांगत्व प्रमाणपत्र / UDID कार्ड बाबतची सविस्तर माहिती Google form : https://forms.gle/Kj6hTc5MfVNFXgcm7 वर भरणे आवश्यक आहे.

जे दिव्यांग अधिकारी दिव्यांगत्व प्रमाणपत्र /UDID ओळखपत्राची प्रत सादर करणार नाहीत किंवा चुकीचे/बनावट प्रमाणपत्र सादर केल्यास संबंधित अधिकारी यांच्याविरुद्ध दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ (कलम ९१) नुसार शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येईल.

(रश्मी नांदिवडेकर)
सहसंचालक (प्रशासन)
लेखा व कोषागारे, मुंबई.

प्रति,
सर्व संबंधित अधिकारी